**<u>ठळक बातम्या</u>**

- केवळ परीक्षेत गुण मिळवण्याऐवजी विषयावर प्रभुत्व मिळवण्यासाठी अभ्यास करण्याचं प्रधानमंत्र्यांचं विद्यार्थ्यांना 'परीक्षा पे चर्चा' मधून आवाहन
- राज्य शिक्षण मंडळाची इयत्ता १२ वी परीक्षा उद्यापासून, संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोनद्वारे नजर
- हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेला राज्यातल्या ५ जिल्ह्यात सुरुवात

**आणि**

- सोन्याचे दर पुन्हा नव्या उच्चांकावर, शेअर बाजारात मात्र घसरण

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना केवळ गुण मिळवण्याचा विचार न करता संबंधित विषयावर प्रभुत्व मिळवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे, असा सल्ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज परीक्षा पे चर्चा कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना दिला.

**होल्ड - कॅप्सूल**

*विद्यार्थ्यांची क्षमता, अंगभूत कौशल्य आणि कामातला आनंद या गोष्टींना परीक्षेतले गुण, स्पर्धा आणि इतरांशी तुलना यापेक्षा महत्त्व दिलं पाहिजे, असं प्रधानमंत्र्यांनी शिक्षक, आणि पालकांना सांगितलं. परीक्षेप्रमाणेच जीवनशैली विषयक अनेक प्रश्नांना मोदी यांनी उत्तरं दिली.*

*यावेळी देशातल्या विविध राज्यातून आलेल्या ३६ विद्यार्थ्यांशी प्रधानमंत्र्यांनी नवी दिल्लीत संवाद साधला. परीक्षेविषयी मार्गदर्शनासह प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना सदृढ आरोग्य राखण्याबाबत सल्ला दिला. आहारात बाजरी आणि भाज्यांचा समावेश करायला*

*त्यांनी सांगितलं. चांगल्या आरोग्यासाठी चांगल्या झोपेची आवश्यकता प्रधानमंत्र्यांनी समजावून दिली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची उत्तरं दिली. तसंच त्यांना वेळेचं महत्व समजावून सांगितलं. अवघड वाटणाऱ्या विषयाचं आव्हान स्वीकारून त्याचा अभ्यास करण्याचं आवाहनही प्रधानमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना केलं. राज्यातही विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.*

**<><><><><>**

विद्यार्थ्यांनी इतरांशी स्पर्धा न करता स्वतःशी स्पर्धा करावी आणि मनातल्या भितीवर विजय मिळवावा, असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विद्यार्थ्यांना दिला. परीक्षा पे चर्चा हा संवाद ऐकल्यानंतर ते बोलत होते. परीक्षा हेच अंतिम उद्दिष्ट नसून विद्यार्थ्यांनी जीवनातल्या आव्हानांशी सामना कसा करावा हे समजण्यासाठी प्रधानमंत्र्यांशी झालेला संवाद उपयुक्त आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेला उद्यापासून सुरुवात होत आहे. या राज्यभरातले १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थी ही परीक्षा देणार असून त्यासाठी ३ हजार ३७३ परीक्षा केंद्रांची निर्मिती करण्यात आली आहे. परीक्षा काळात संभाव्य गैरप्रकारांना आळा बसावा, या दृष्टीने मंडळानं २७१ भरारी पथकांची नेमणूक करण्यात आली आहे.

परीक्षेदरम्यान कॉपीमुक्त अभियान राबवण्यात येणार आहे. या अंतर्गत राज्यातल्या संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याने निगराणी ठेवली जाणार आहे. तसंच, परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ

चित्रीकरण करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटर परिघातली झेरॉक्स केंद्र परीक्षा काळात बंद ठेवण्यात येतील आणि या काळात जमावबंदीचे आदेशही देण्यात आले आहेत. कोणत्याही केंद्रावर गैरप्रकार घडला तर संबंधितांवर दखलपात्र आणि अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा मंडळाने अधिकृत पत्रकाद्वारे दिला आहे.

**<><><><><>**

जागतिक आरोग्य संघटना आणि केंद्रसरकारच्या आरोग्य मंत्रालयातर्फे हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेला आज सुरुवात झाली. पालघर, नांदेड, गडचिरोली, भंडारा आणि चंद्रपूर या ५ जिल्ह्यांतल्या मिळून ३४ तालुक्यांमध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मोहिमेचं उद्घाटन दूरदृष्यप्रणालीमार्फत केलं. मोहिमेअंतर्गत दोन वर्षांपेक्षा लहान बालकं, गरोदर माता आणि गंभीर आजारी व्यक्ती वगळता सर्वांना प्रतिबंधक गोळ्यांचा डोस देण्यात येणार आहे.

**<><><><><>**

अलमट्टी धरणाची उंची वाढवण्याच्या निर्णयाला महाराष्ट्रासह कोणत्याही राज्यानं विरोध केलेला नाही, असं केंद्रीय जलशक्तीमंत्री सी आर पाटील यांनी लोकसभेत सांगितलं. खासदार विशाल पाटील यांनी याबाबत तारांकित प्रश्न उपरस्थित केला होता, त्यावर जलशक्ती मंत्र्यांनी लेखी उत्तर दिलं. धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय कर्नाटक सरकारनं घेतला, त्याला कृष्णा पाणी लवादानं मंजुरी दिली. या प्रश्नावर कोणत्याही राज्याकडून

धरणाची उंची वाढवायला विरोध असल्याचा प्रस्ताव दाखल झालेला नाही, असा खुलासा लेखी उत्तरात केला आहे.
कर्नाटक सरकारनं अलमट्टी धरणाची उंची पाच मीटरनं वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या धरणाचं पाणी शिरोळ तालुक्यापर्यंत पोहोचणार असून पावसाळ्यात सांगली आणि कोल्हापूर हे दोन्ही जिल्हे जलमय होऊ शकतात, असा दावा जलतज्ज्ञांनी यापूर्वी केला आहे.

<><><><><>

गोंदिया जिल्हा परिषदेत आज सभापतीपदांसाठी निवडणूक पार पडली. यात भाजपाचे चार सभापती निवडून आले. गोंदिया जिल्हा परिषदेत भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती असल्यामुळे एक सभापती पद राष्ट्रवादीला दिलं जाईल असं सांगितलं जात होतं, मात्र चारही जागांवर भाजपाच्या सदस्यांची निवड झाली आहे. ५३ सदस्यांच्या गोंदिया जिल्हा परिषदेत भाजपाचे ३० सदस्य असून राष्ट्रवादी काँग्रेसचे आठ सदस्य आहेत.

<><><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या करधोरणामुळे गुंतवणूकदारांनी शेअर बाजाराऐवजी सोन्यात गुंतवणूक वाढवली आहे. त्यामुळं आज सोनं तोळ्यामागे सुमारे हजार रुपयांनी महाग झालं. आज २४ कॅरेट सोन्याचे दर तोळ्यामागे ८८ हजार २३५ रुपये इतके झाले. २२ कॅरेट सोन्याचे दर तोळ्यामागे ८७ हजार ८९२ रुपये इतका झाले आहेत.

चांदी २ हजार रुपयांनी महाग होऊन किलोमागे ९७ हजार ५०० रुपयांवर पोहोचली.

<><><><><>

अमेरिकेचे धोरणांच्या परिणामामुळे सलग चौथ्या दिवशी भारतीय शेअर बाजारात घसरण पाहायला मिळाली. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ५४९ अंकांची घसरण झाली, आणि तो ७७ हजार ३१२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १७८ अंकांची घसरण नोंदवत २३ हजार ३८१ अंकांवर बंद झाला.

<><><><><>

प्रयागराज इथं सुरू असलेल्या कुंभमेळ्याला जाणाऱ्या भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे १६ गाड्या चालवत असून या सर्व स्थानकांवरची परिस्थिती सुरळीत आहे. यासंदर्भात कोणत्याही अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असं आवाहन मध्य रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी केलं आहे. राज्यातून दररोज सुमारे २० विशेष आणि नियमित गाड्या प्रयागराज आणि त्या भागासाठी चालवल्या जात आहेत. इथल्या रेल्वेस्थानकांवर प्रशासनाचं बारीक लक्ष असून गर्दी जास्त वाढल्यास तिथून तातडीनं अतिरिक्त रेल्वेगाड्या सोडल्या जात आहेत. गरज पडल्यास आणखी रेल्वेगाड्या सोडण्याचीही रेल्वे प्रशासनाची तयारी आहे, असंही नीला यांनी सांगितलं.

पश्चिम रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक पंकज सिंह यांनीही नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवायचं आवाहन केलं आहे. भाविकांच्या समस्या

सोडवण्यासाठी विविध रेल्वेस्थानकांवर मदत केंद्रंही स्थापन केल्याची माहिती त्यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्र प्रदेश भाजपाने एक कोटी सदस्यसंख्येचा टप्पा ओलांडला आहे. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी समाजमाध्यमावर ही माहिती प्रसिद्ध केली आहे. पक्षकार्यकर्त्यांचे परिश्रम आणि पक्षविचारसरणीशी निष्ठा यामुळे हे यश मिळाल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत कोलकाता इथं सुरु असलेल्या उपांत्यपूर्व सामन्यात, मुंबईनं आज तिसऱ्या दिवसअखेर दुसऱ्या डावात हरयाणावर २९२ धावांची आघाडी घेतली.

मुंबईनं प्रथम फलंदाजी करताना पहिल्या डावात ३१५ धावा केल्या होत्या. तनुष कोटियनच्या ९७, आणि शम्स मुलानीच्या ९१ धावांचा त्यात मोलाचा वाटा होता. हरयाणाचा पहिला डाव आज ३०१ धावांवर संपला. कर्णधार अंकित कुमारनं १३६ धावा केल्या. या डावात मुंबईतर्फे शार्दुल ठाकूरनं ६ गडी बाद केले.

मुंबईनं दुसऱ्या डावात आज दिवसअखेर ४ बाद २७८ धावा केल्या. आजचा खेळ थांबला तेव्हा कर्णधार अजिंक्य रहाणे ८८, तर शिवम दुबे ३० धावांवर खेळत होता. सुर्यकुमार यादवनं ७० धावा केल्या.

<><><><><>

गेल्या चोवीस तासात कोकण, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी, तर मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय वाढ झाली. राज्यात सर्वात कमी किमान तापमान ब्रम्हपुरी इथं १६ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

//<><><><><>//